# यशस्वी कौटुंबिक जीवनाचे रहस्य

## The Secret of A Successful FAMILY LIFE


मौलाना वहीदुद्दीन खान





## Towards Spiritual Living


Al-Risala and Spirit of islam are two monthly spiritual magazines. They aim at helping indivuduals discover for themselves answers to their questions on spirituality, religion, this life and life beyond, and also instill in them the spirit of dawah work.





## Annual Subscription

Al-Risala : India - ₹200 Overseas - US $ 20

Spirit of Islam : India - ₹400 Overseas - US $30

**Al-Risala**
1, Nizamuddin West Market, New Delhi - 110013
Tel.: 011-41827083 / 46521511 / Mob.: +91-8588822679 / +91-8588822680

**Spirit of Islam**
002, HM Wimberly, 6, Barlie Street Cross, Langford Town, Bangalore - 560025
**Mob.:** +91-8050202626 / **Email :** subscription @thespiritofislam.org
**Web :** www.spiritofislam.co.in

---

ही पुस्तिका खालील पत्त्यावर मिळेल.

**अब्दुस समद खलिल अहेमद**

**१०५०, रविवार पेठ, पुणे - ४११००२**

**फोन नं. : 020 24472830 मोबा. नं.: 9665059035**

# यशस्वी कौटुंबिक जीवनाचे रहस्य

## The Secret of A Successful FAMILY LIFE (Marathi)

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| १ | जीवनाचे व्यवस्थापन | १ |
| २ | अयशस्वी व्यवस्थापन | १ |
| ३ | हस्तक्षेप नको | २ |
| ४ | फार्म्युला ३० सेकंदाचा | ३ |
| ५ | साधेपणा जीवनाचे तत्त्व | ३ |
| ६ | आदर्श कुटुंब | ४ |
| ७ | कव्वामियत / बॉसिझम | ४ |
| ८ | स्त्री एक जीवनसाथी | ५ |
| ९ | समाधानाचा स्त्रोत | ६ |
| १० | संवेदनशीलता विरुद्ध अहंकार | ७ |
| ११ | घर: व्यक्ती घडवण्याचा कारखाना | ८ |
| १२ | कौतुकामुळे नुकसान | ९ |
| १३ | मातेचे हृदय | ९ |
| १४ | जीवनाचा उद्देश | १० |
| १५ | महिलांचे महत्व | ११ |
| १६ | लिंगभेद | ११ |
| १७ | घर एक संस्था | १२ |
| १८ | एकपत्नीत्व आणि बहुपत्नीत्व | १२ |
| १९ | प्रेमभंग | १३ |
| २० | आईवडिलांची भूमिका | १३ |
| २१ | स्त्री शिक्षण | १४ |
| २२ | तडजोड | १५ |

| अ.क्र. | विषय | पान क्र. |
|---|---|---|
| २३ | बाबुलकी दुवा | १५ |
| २४ | यशाचे रहस्य | १६ |
| २५ | माहेर–सासर मतभेद | १७ |
| २६ | संयुक्त कुटुंब | १८ |
| २७ | सासु आणि सून | १९ |
| २८ | एक निरीक्षण | १९ |
| २९ | मानसिकतेचा बिमोड | २० |
| ३० | सर्वाधिक मोठी कृपा | २१ |
| ३१ | नकारात्मक विचार | २१ |
| ३२ | सुसंगती | २२ |
| ३३ | बुद्धिवादी साथीदार | २३ |
| ३४ | परस्पर विश्वास | २३ |
| ३५ | सौंदर्य की चारित्र्य | २४ |
| ३६ | ‘ध’ चा ‘मा’ ! | २५ |
| ३७ | एक घटना | २५ |
| ३८ | रागावर नियंत्रण ठेवा ! | २६ |
| ३९ | थांबा ! | २६ |
| ४० | दुराग्रह का निर्धार | २७ |
| ४१ | हुशार महिला | २८ |
| ४२ | कोणतीही परिस्थिती कल्याणकारी | २८ |


मुल्य : ₹ २०.००

# १) जीवनाचे व्यवस्थापन

यशस्वी जीवनासाठी जीवन जगण्याचे कौशल्य आणि व्यवस्थापन समजणे आवश्यक आहे. जीवन जगण्याचे कौशल्य आणि व्यवस्थापन याचा अर्थ स्वतःबद्दल आकलन (आपण कोण आहोत आणि आपल्यामध्ये कोणते गुणविषेश आहेत याची जाणीव). त्याचबरोबर जगामध्ये जे काही घडत आहे त्याचे भान असणे आवश्यक आहे. यामुळे जीवनाचे नियोजन करता येते आणि आवश्यकतेनुसार त्यात सुधारणा करता येते. एखाद्याने आपल्या जीवनात चांगल्या प्रकारे व्यवस्थापन केले अथवा नाही हे पाहाण्यासाठी परिणाम हा निकष आहे. परिणाम नकारात्मक असेल तर नियोजन अयोग्य आणि सकारात्मक असेल तर नियोजन योग्य. आदर्श प्रमाणबद्धतेच्या निकषावर एखाद्या कृतीचे मूल्यमापन करणे शहाणपणाचे नाही. परिणामाच्या निकषावरच मूल्यमापन करणे शहाणपणाचे आहे. पती आणि पत्नी यांच्यातील नाते नाजुक आहे. कारण ते रक्ताचे नाते नाही. आणि म्हणून हे नाते यशस्वी करण्यासाठी भावना नव्हे, तर विवेक अधिक महत्वाचा आहे, स्वतःच्या नात्यामध्ये भावनिक बंधन असले तरीदेखिल त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे आवश्यक आहे. पती आणि पत्नी यांच्या नात्यामध्ये निसर्गत: रक्ताच्या नात्यामध्ये अलसेला प्रभाव नसतो. त्यामुळे विवेकावर आधारित व्यवस्थापन नसल्यास हे नाते सांभाळणे कठीण असते. थोडक्यात स्वतःचे नाते उपजतच प्रस्थापित होते. याउलट रक्ताचे नाते नसल्यास जाणीवपूर्वक प्रयत्न करुनच संबधित नाते प्रस्थापित करणे शहणपणाचे आहे.

# २) अयशस्वी व्यवस्थापन

एकदा एक उद्योगपती आपली मुलगी घेऊन माझ्याकडे आला, त्याची मुलगी लवकरच विवाहबद्ध होणार होती. ''तिचे वैवाहिक जीवन सुखसमृद्धीचे व्हावे यासाठी ती प्रार्थना करते असे ती मला सांगते.'' असे त्या उद्योगपतीने मला सांगितले. मी सागितले की, अयशस्वी व्यवस्थापन म्हणजे काय? हे ज्या पतीपत्नीना समजते त्या व्यतिरिक्त प्रत्येक विवाह अयशस्वी होतो. विवाह एक आदर्श या दृष्टिकोनातून पाहाण्यात यावे आणि त्याप्रमाणे त्याचा किंवा तिचा स्वीकार करण्यात यावा. काही आदर्शाच्या मापदंडाने लोक साथीदारांचे

मूल्यमापन करतात. ज्यावेळी अपेक्षेप्रमाणे मूल्यमापन होत नाही त्यावेळी आदर्श साथीदार मिळत नाही असे वाटते. पती आणि पत्नी दोघांच्या बाबतीत असे घडते. त्यामुळे त्यांच्या एकत्रित येण्यामध्ये होणारा आनंद त्यांना अनुभवता येत नाही. पुरुष अथवा स्त्री दोघेही समान आहेत ही वस्तुस्थिती आहे. शारीरिकदृष्ट्या ते भिन्न आहेत. परंतु आंतरिकदृष्ट्या दोघांमध्ये फारसा फऱक नाही. पतीपत्नी यांच्या हे लक्षात आले तर एक दुसऱ्यांपासून त्यांना आनंद होईल आणि उत्तम साथीदार म्हणून ते एकदुसऱ्याचा स्वीकार करतील.

## ३) हस्तक्षेप नको

एकदा एका सुशिक्षित गृहस्थास त्याच्या कौटुंबिक जीवनाबद्दल मी विचारले. तो म्हणाला ''माझे कौटुंबिक जीवन चांगले आणि आनंददायी आहे ''मी विचारले, ''तुमच्या यशाचा फार्म्युला काय?'' त्याने उत्तर दिले, कोणताही हस्तक्षेप नाही. ''याचा अर्थ असा की, तो अथवा त्याची पत्नी एकदुऱ्याच्या कामात ढवळाढवळ करत नाही. घरांमध्ये शांतता राहावी या साठी हे तत्त्व चांगले आहे. पालनकर्त्याने (अल्लाहने) पुरुष आणि स्त्री यांना भिन्न प्रकृती आणि् भिन्न स्वभावगुणधर्म बहाल केले आहेत. प्रत्येक पुरुष आणि् प्रत्येक स्त्री भिन्न आहे. म्हणून विवाह म्हणजे दोन भिन्न प्रकृतींमधील नाते. पालनकर्त्याने स्वतःच हा भेद निर्माण केल्यामुळे त्यामध्ये बदल करण्याचे आमच्यामध्ये सामर्थ्य नाही. अशा प्रकारे बदल करण्याचा व्यर्थ प्रयत्न करणाऱ्यांना आम्ही तडजोड करावयास शिकवले पाहीजे. याचेच (The art of diferrence management) या शब्दात वर्णन करता येईल. भेद असणे ही वाईट गोष्ट नाही. त्यामध्ये मोठे फायदे आहेत. वेगळेपणा अर्थात भेद याचा अर्थ निव्वळ वेगळेपणा. त्यामधे दोन भिन्न शक्तींचे प्रतिनिधित्व पाहाणे आवश्यक आहे. जर पुरुष व स्त्री या दोघांमध्ये एकसारख्याच क्षमता अथवा शक्ती असत्या तर त्यापासून त्यांना अधिक चांगले करता आले असते असे नाही. साम्यतेचा आभाव हे भौतिक विकासाचे रहस्य आहे असे म्हणले जाते. जर प्रत्येकाने एकसारखा विचार केला असता तर प्रत्येकाला अधिक विचार करावयास लागला नसता. आणि म्हणून हस्तक्षेप न करण्याची भूमिका ही सर्वसामान्यपणे घरातील व बाहेरील जगात सर्वोत्तम भूमिका !

# ४) फार्म्युला ३० सेकंदाचा!

मनुष्य स्वभावत:च अहंकारी आहे. तर स्त्री ही भावनाशील आहे. दोघांमध्ये मतभेद झाल्यास ते एकदुसऱ्याच्या विरोधात उभे राहातात. या वर एकच उपाय आहे, ज्यावेळी माणसाचा अहंकार भडकतो, तेव्हा स्त्रीने शांत राहावे. ज्यावेळी स्त्री भावनिक होते व तिच्या भावनांचा उद्रेक होतो, त्यावेळी पुरुषाने शांत राहावे. त्याने कोणत्याही प्रकारची प्रतिक्रिया व्यक्त करु नये, हा एकमेव उपाय आहे. राग येणे ही नकारात्मक भावना आहे. सुरुवातीला राग मर्यादित असतो, परंतु जर नियंत्रण ठेवले नाही तर राग त्याची मर्यादा ओलांडतो. नकारार्थी भावनांच्यासंबंधी स्वाभाविक नियम असा आहे की, त्या साधारणपणे ३० सेकंदात भडकतात. त्यावर नियंत्रण ठेवल्यास फुग्याप्रमाणे नाहीशा होतात. म्हणून एखाद्या व्यक्तीने आपल्या रागावर नियंत्रण ठेवले तर ही नकारात्मक भावना स्वाभाविकपणेच नाहीशी होईल आणि तिचा कोणताही नकारात्मक परिणाम होणार नाही.

# ५) साधेपणा जीवनाचे तत्त्व

आयुष्यातील साधेपणाचे तत्त्व अनेक पालकांना समजलेले नाही. असा माझा अनुभव् आहे. जबरदस्तीनेच ते त्याची निवड करतात. खूप ज्ञान ग्रहण करीत असतात. आपल्या पालकांच्या पद्धतीमुळे व विचारांमुळे ते प्रभावित होतात. अशा पालकांची मुलें आयुष्यात साधेपणाचे काय महत्व आहे ते समजू शकत नाहीत. साधेपणा म्हणजे काय? साधेपणा म्हणजे माणसाची ती अवस्था, की ज्यावेळी तो जीवनाचा उद्देश समजून घेतो. त्याला तो महत्व देतो, आणि इतर बाबींना दुय्यम दर्जा देत असतो. उच्च नैतिक चारित्र्य विकसित करणे व त्यातूनच व्यक्तिमत्व घडवणे हे प्रत्येकांसाठी महत्वाचे आहे. पालनकर्त्याने मानवामध्ये फार मोठी क्षमता निर्माण केली आहे. मानवाने ते लक्षात घेतले पाहिजे. आपल्यामधील क्षमता शोधून काढणे, व आयुष्यात त्याचा काय हेतु आहे हे समजणे महत्वाचे आहे. अभ्यास करुन व अनुभवाने ते मानसिक विकास करु शकतात. वेळेचे व्यवस्थापन व आपल्या ध्येयपूर्तीसाठी आपल्यात असणाऱ्या कौशल्याचा उपयोग करणे आणि वेळेचे व्यवस्थापन कसे करावे हे त्याने समजून घेतले पाहिजे. ध्येयाने प्रेरित जीवन हे आदर्श जीवन

आहे. साधेपणा आदर्श जीवनासाठी गरजेचे आहे. अनावश्यक खर्च आणि विचलित होणे यापासून साधेपणा माणसाला परावृत्त करतो. जीवनाचे ध्येय साध्य करण्यामध्ये अनाठाई विचलित होणे अडथळा आहे.

## ६) आदर्श कुटुंब

पवित्र कुरआनच्या ३३ व्या सूरःमध्ये पैगंबरांच्या आदर्शजीवनाबद्दल सांगण्यात आले आहे. ''तुमच्यामधील विकृती काढून टाकणे व तुम्हाला पवित्र व निष्कलंक करणे ही निर्मात्याचीच इच्छा आहे.'' (३३-३३) ही आयत पैगंबरांचे कुटुंब आदर्श असल्या कारणाने सर्वानाच लागू होते. प्रत्येक मुस्लिम कुटुंबाने पैगंबरांच्या कुटुंबाप्रमाणे वर्तणूक करावी, अशी अल्लाहाची इच्छा आहे. त्यासाठी सर्व मुस्लिम कुटुंबांनी आपला मार्ग चोखाळणे गरजेचे आहे. प्रत्येक घऱ हा एक घटक आहे. अशा प्रकारचे अनेक घटक मिळून समाज तयार होतो. समाजाच्या प्रत्येक घटकात सुधारणा झाली तर समाजात सुधारणा होईल. पण संपूर्ण घटक मार्गभ्रष्ट झाला तर संपूर्ण समाजही मार्गभ्रष्ट होईल. याबाबतीत पैगंबरांच्या कुटुंबाप्रमाणे किंवा ज्याचा उल्लेख़ पवित्र कुरआनात करण्यात आला आहे याची जबाबदारी प्रत्येक घटकावर आहे. शुद्धता व स्वच्छता यांच्या प्रक्रियेतून प्रत्येक मुस्लिम कुटुंबास जावयाचे आहे. त्यामुळे विकृती नाहीशी होईल व चांगुलपणा प्रभावित होईल. कुटुबातील प्रत्येक स्त्री व पुरुषाची ही जबाबदारी आहे. त्यामुळे चांगला समाज निर्माण होईल. या संदर्भात पुरुष व स्त्री दोघेही जबाबदार आहेत. मात्र पुरुषाचा दर्जा नियंत्रकासारखा व स्त्रीचा दर्जा नियंत्रकाची साहाय्यक असा आहे. पती आणि पत्नी यांनी आपली ही जबाबदारी समजून घेतली पाहिजे आणि त्याप्रमाणे आपली भूमिका बजावली पाहीजे. हे त्यांचे कर्तव्य आहे. निर्मात्याने त्यांच्यावर कर्तव्य लादले आहे. त्यांनी जर त्यांची भूमिका पार पाडली तर त्याना निर्मात्याकडून योग्य तो लाभ प्राप्त होईल. जर नाही केले तर त्यांना शिक्षा होईल. ती फार भयानक आहे.

## ७) कव्वामियत / बॉसिझम

पवित्र कुरआनच्या ४ थ्या सूरःमध्ये म्हटले आहे ''पुरुष हे स्त्रीयांचे संरक्षक आहेत. ''(४-३४). त्यासाठी 'कव्वाम' या शब्दाचा उपयोग करण्यात आला आहे. सध्या प्रचलित असलेल्या बॉस या शब्दाप्रमाणेच कव्वाम या

शब्दाचा अर्थ आहे. बॉस या शब्दामध्ये एक मालक व दुसरा त्याचा नोकर असा आहे. कव्वाम या शब्दाचा वेगळा अर्थ आहे. याचा संदर्भ हुकूम करणे किंवा स्त्रीयांपेक्षा अधिक श्रेष्ठ असणे असा नसून कव्वामचा संदर्भ नियोजनाशी निगडित आहे. या उदाहरणावरुन कव्वामियतची संकल्पना लक्षात येईल. कव्वामियत म्हणजे पुरुष हा कुटुंबप्रमुख. एखाद्या संस्थेचा, कंपनीचा प्रमुख कंपनीचे प्रशासन बघतो. कंपनीच्या प्रशासनावर नियंत्रण ठेवतो . याचा अर्थ त्याच्यावर सत्ता गाजवत नाही. एक म्हण आहे, "The Boss is always right". बॉसचे नेहमीच बरोबर असते. याचा अर्थ बॉस श्रेष्ठ आहे असा नाही. तर एखादी संस्था, संघटना यशस्वीपणे चालवण्यासाठी कोणीतरी पदावर असणे, प्रशासकीय जबाबदारी सांभाळणे आवश्यक आहे. अशाप्रकारे घर ही एक संस्थाच आहे. आणि् यशस्वीपणे चालवण्यासाठी प्रमुखाची अथवा बॉसची गरज आहे. याच अर्थाने पवित्र कुरआनमध्ये पुरुषाचा उल्लेख कव्वाम असा केलेला आहे. कोणत्याही घराचा कव्वाम याचे पद मॅॅनेजर अथवा प्रशासक याप्रमाणे असते. घरातील इतर सदस्यांच्या तुलनेत तो सर्वश्रेष्ठ असतो. जर हे मान्य केले नाही तर घरामध्ये घऱ हे अनागोंदीचे भक्ष्य होईल. बॉस होणे म्हणजेच दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ होणे असे नाही, त्याचप्रमाणे कव्वामियत ही एक जबाबदारी आहे. ती प्रशासकीय गरज पूर्ण करत असते. एक दुसऱ्यावर श्रेष्ठत्व गाजविण्यासाठी नाही. हा व्यावहारिक अर्थ समजला तर कव्वामियतचा अर्थ समजणे शक्य होईल.

## ८) स्त्री एक जीवनसाथी

पवित्र कुरआनात म्हटले आहे. ''तुमची पत्नी तुमच्यासाठी शेतीप्रमाणे आहे. तुम्ही तुमच्या इच्छेप्रमाणे तुमच्या शेतीकडे जा. पुण्यकर्म पुढे पाठवा. अल्लाहचे भय बाळगा. एक दिवस तुमची व अल्लाहची भेट होणार आहे. श्रध्दावंतांना शुभवार्ता द्या'' (२–२२३) या आयतमध्ये चांगले कृत्य करा, हा प्रमुख मुद्दा आहे. याचा अर्थ असा आहे की, भवितव्यासाठी फायदेशीर ठऱणारे कृत्य हे माणसाच्या प्रत्येक कसोटीची तयारी आहे. त्यामुळे येणाऱ्या जगात त्याला स्थान मिळणार आहे. आयुष्यात माणसाचे हेच ध्येय असायला पाहिजे. आयुष्यातील या ध्येयाशी स्त्री कशी निगडित आहे हेसुद्धा या आयतमध्ये स्पष्ट

केले आहे. पुरुषांना साहाय्य करण्यासाठी अल्लाहने स्त्रीला निर्माण केले आहे ज्याप्रमाणे शेती शेतकऱ्यास साहाय्य करते. ही आयत पवित्र कुरआनातील एक महत्वपूर्ण आयत असून तिचे मक्का येथे प्रकटीकरण झाले. ज्यावेळी जीवनात स्त्रीची भूमिका काय आहे याबद्दल लोकांत चर्चा करण्यात येत होती त्या काळी स्त्रीयांबद्दल लोकांना दोनच गोष्टी माहीत होत्या. एक लैगिक सुख व दुसरी मानवी जीवनाचे शाश्वत रहस्य.

मात्र या दोन गोष्टींव्यतिरिक्त एक यशस्वी जीवन घडविण्यामध्ये स्त्रीयांचे योगदान आवश्यक आहे. पवित्र कुरआनची ही शिकवण आहे आणि म्हणून निसर्गाने बहाल केलेली ही तरतूद याचा माणसाने उपयोग करावा आणि स्वतःसाठी यशस्वी जीवनाची फेररचना करावी. स्त्रीयांसबधी यापेक्षा कमी प्रतिष्ठेची कोणतीही कल्पना स्त्रीयांचे स्थान कमी आहे असे दर्शविते. पुरुष व स्त्री विवाहाच्या माध्यमातून एकत्रित येतात आणि मानवी जीवनाच्या उद्धारासाठी चांगली भूमिका बजावतात.

## १) समाधानाचा स्त्रोत

पवित्र कुरआनच्या ३० व्या सूरःमध्ये म्हणण्यात आले आहे, ''त्याने तुमच्यामधूनच तुमचे साथीदार निर्माण केले आहेत. तुम्हाला विश्रांती मिळावी म्हणून!'' (२०–२१) याठिकाणी विश्रांती अथवा समाधान म्हणजे वैवाहिक समाधान नाही. आयुष्यात चांगली भूमिका वठविण्यासाठी शांत स्वभावाच्या साथीदाराला साहाय्य मिळावे याच्याशी याचा संदर्भ आहे. एकत्रितपणे केलेले प्रयत्न या जगामध्ये फार मोठे कार्य करण्याचे सामर्थ्य प्रदान करतात. एकटीच व्यक्ती फार मोठी कामगिरी करु शकत नाही. यासाठी पुरुष व स्त्री या दोघांना विवाहातून स्वाभाविकपणे एकत्र येणे आवश्यक आहे. यामध्ये दोन आत्मे एकवटतात व त्या दोन आत्म्यांचे असे ऐक्य आहे की, यातूनच परस्पर प्रेम व विश्वास निर्माण होतो. पुरुष व स्त्री यांच्यात विवाहाच्या माध्यमातून एकत्र येणे या जगात फार महत्वाचे आहे. पती व पत्नीच्या हे लक्षात आले आणि निर्मात्याची ही कृपा आहे हेदेखील त्यांच्या लक्षात आले तर ते एकत्रितपणे मोठी कामगिरी करु शकतात.

ख्यातनाम फ्रेंच जोडपे पायरेक्युरी १९०६ व मेरीक्युरी १९३४ यांनी

आधुनिक विज्ञानात एकत्रितपणे फार मोठी कामगीरी केली. त्यांचे कार्य मान्यताप्राप्त झाले. त्याना १९०३ व १९११ मध्ये नोबेल परितोषिक मिळाले. अशाच प्रकारची क्षमता इतर पुरुष व स्त्री यांच्यापासून अपेक्षित आहे. आपल्या खास क्षेत्रात कोणतेही जोडपे यश प्राप्त करु शकते व इतिहास घडवू शकते. पुरुष व स्त्री यांना निसर्गाने मोठ्या क्षमता बहाल केल्या आहेत. ज्याला आपल्या भूमिकेची जाणिव होते तो खूप परिश्रम घेवू शकतो. तो आपल्या क्षेत्रात प्राविण्य मिळवू शकतो. सुदैवाने स्त्रीयांची भूमिका पाश्चिमात्य किंवा पौर्वात्य जगाने पूर्णपणे ओळखली नाही.

## १०) संवेदनशीलता विरुद्ध अहंकार

पुरुष व स्त्रीया विवाहबद्ध होणे म्हणजे दोन विरुद्ध स्वभावाच्या व्यक्तींचे एकत्रित येणे. स्त्री भावनावश तर पुरुष अहंकारी आहे. त्यांचे हे गुण त्यांच्या स्वभावाचा एक भाग असतो.यामध्ये सकारात्मक त्याचप्रमाणे नकारात्मक गुणदोष असतात. जर त्या सकारात्मकतेचा उपयोग कामासाठी करण्यात आला तर मानवतावादासाठी ते वरदानच आहे. परंतु नकारात्मक उपयोग केला तर मानवतावादासाठी ते अपायकारक आहे. माणसामधील अहंकार एखाद्या कामामध्ये त्याला चालना देणारी शक्ती आहे. माणसामध्ये या गुणांचा अभाव असेल तर तो कमकुवत होईल व त्याची इच्छाशक्ती कमी होईल. निर्धार व सातत्य याची गरज आहे. अशा कामात त्यांना यशप्राप्ती होत नाही. नकारात्मक दृष्टीकोन त्याला उद्धट बनवतो आणि म्हणूनच याबाबतीत काळजी बाळगणे गरजेचे आहे. अहंकारास नकारात्मक दिशेला जाऊ देऊ नये.

त्याचप्रमाणे स्त्री जन्मतःच भावनिक असते. या गुणांचेदेखिल काही सकारात्मक व नकारात्मक पैलू आहेत. सकारात्मक पैलू हा आहे की, स्त्रिया अधिक संवेदनशील बनतात आणि नकारात्मक पैलू असा आहे की, तिच्या स्वभावात बदल होतो व ती दुराग्रही बनते आणि हा आग्रह कामकाजात दिसून येतो. जर तिच्या स्वभावातील पैलूंवर नियंत्रण ठेवले नाही तर तिच्या व्यक्तिगत विकासासाठी ते घातक होईल. ज्या स्वाभाविक गुणधर्मानुसार जन्म मिळाला आहे त्याप्रमाणे त्यांनी प्रयत्न केला पाहीजे. कोणत्याही नकारात्मक भूमिकेपासून त्यानी अलिप्त राहावे. या नियंत्रणात स्त्री व पुरुष दोघांच्या यशाचे रहस्य आहे.

# ११) घर : व्यक्ती घडवण्याचा कारखाना

भावी पिढी घडविण्याची जबाबदारी आईची आहे. मानवी पिढी ही वाहत्या नदीसारखी आहे. प्रत्येक वेळी वाहाणारे पाणी पुढे जाते. त्याच्या जागी नवीन पाणी येते. असाच माणसाचा प्रकार आहे. म्हणजे जुनी पिढी जाते व नवीन पिढी त्याची जागा घेते. चांगल्या व्यक्तीचा पुरवठा करणे ह्याची जबाबदारी मातेची आहे. चांगल्या व्यक्तीची व्याख्या काय? जीवनास जो धैर्याने तोंड देणारा असतो त्याला चांगली व्यक्ती म्हणतात. ज्याचा दृष्टीकोन सकारात्मक आहे तो आपल्या बुद्धीप्रमाणे विकसनशील समाजास आपले योगदान देतो. त्यामध्ये आईची भूमिका कोणती आहे? नान्सी अल्वा एडिसन, थॉमस अल्वा एडिसनची आई ही लहानपणापासून एडिसनला कमी ऐकायला येते म्हणून त्याची काळजी घेत असे. त्याची शाळेतील प्रगती चांगली नव्हती. मतीमंद विद्यार्थी म्हणून शाळेतून नांव काढून टाकले. पण त्याच्या आईने चांगली भूमिका बजावली. मुलगा मतीमंद नाही हे मुलाच्या मनात भिनवले. तिने मुलाला सांगितले, ''हे तुझ्यासाठी एक आव्हान आहे.'' एडिसनच्या शिक्षणाचा तिने ध्यास घेतला. तिने त्याचे अडथळे दूर करण्यासाठी त्याच्या स्वाभाविक क्षमतेचा उपयोग केला. परिणामतः जगातील एक थोर शास्त्रज्ञ म्हणून एडिसनची इतिहासात नोंद आहे.

सर्वसाधारणपणे असे समजले जाते की श्रीमंतापोटी जन्माला येणाऱ्याला नशिबवान आणि गरिबापोटी जन्माला येणाऱ्याला दुर्दैवी समजले जाते. इथेही आईची भूमिका महत्वाची आहे. परिस्थिती काहीही असो, श्रीमंत म्हणून जन्माला आला नसला तरी त्याच्या मागे उपजत गुण असतात. तिने आपल्या मुलांना शिकवायला पाहिजे. गरीबीत जन्माला आले तरी अनेक व्यक्तींनी प्रभावी व्यक्तींच्या समूहामध्ये स्थान प्राप्त केलेले आहे आणि म्हणून 'आहेरे' व 'नाहीरे' ही विभागणी चुकीची आहे. या जगामध्ये खऱ्या अर्थाने क्षमता, धैर्य असणे महत्वाचे आहे. त्याचबरोबर सकारात्मक भूमिका असणे हे महत्वाचे आहे. जीवनाच्या वास्तव्यास तोंड देण्यासाठी येणाऱ्या पिढीमध्ये धैर्य अणि परिपक्वता (म्यॅच्यूरिटी) यांसाठी स्फूर्ती निर्माण करणे आवश्यक आहे.

## १२) कौतुकामुळे नुकसान

काही पालकांना असे वाटते की, प्रेमापोटी लग्ऩ झाल्यावर आपल्या मुलीला घरगुती काम करावे लागेल म्हणून ते त्यांना घरात काम करु देत नाहीत. त्यामुळे मुलीचे लग्ऩ होते तेव्हा तिला आपल्या नवीन घराची देखभाल करणे शक्य होत नाही. किंवा ती नवीन जबाबदारी घेऊ शकत नाही. अशा प्रकारचे प्रेम हे खरे प्रेम नाही. आईवडिल मुलीचा जन्म झाल्यानंतर तिच्या लग्ऩासाठी हुंड्याच्या तयारीला सुरवात करतात. अशा प्रकारचा हुंडा फारसा उपयोगी नाही. ते एक थोड्या वेळचे प्रदर्शन असते. हुंड्यामुळे मुलीला नवीन घरांमध्ये प्रस्थापित होण्यास मदत होत नाही. सासुरवाडीत आपली भूमिका निभावण्यासाठी हुंड्याचा काही संबध नाही. भावी आयुष्यासाठी मुलीला तयार करणे हे आईवडिलांचे खरे काम आहे. तिला शिक्षण द्यावयास पाहीजे. सामाजिक रीतीरिवाजाप्रमाणे प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यामुळे जीवन सुरक्षित होईल. लाड अथवा कौतुक हे अनेक घरांची संस्कृती आहे. याचे विविध प्रकारे दर्शन घडते. बहुतेक मुलांच्या सर्व इच्छा पूर्ण करण्यासाठी आईवडिल त्यांचे कौतुक करतात. मुलांच्या चुकांकडे ते दुर्लक्ष करतात.

## १३) मातेचे हृदय

आपल्या मुलांनी आयुष्यात यशस्वी व्हावे असे प्रत्येक आईला वाटत असते. मुलांबद्दल माता भावनाशील असतात. त्यामुळे मुलांच्या विचारांवर त्यांच्या मतांचा पगडा असतो. मुलांच्या सर्व गरजा पूर्ण करण्याचा ते प्रयत्न करत असतात. मूल जन्मास येते त्यावेळी ते शुद्ध आणि पवित्र असते. मात्र वय वाढत जाते तसे ते मूळ स्वभावापासून दूर जात असते.

मुलांना घडविताना मातांनी विधायक भूमिका आचरणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांच्या जन्मजात स्वभावापासून ती दूर जाणार नाहीत. मुलांबद्दल असलेल्या प्रेमामुळे माता त्यांच्या सर्व गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असतात. त्यामुळे आपल्या सर्व गरजा पूर्ण व्हाव्यात असे मुलांना वाटू लागते. मात्र ज्यावेळी मुलगा मोठा होतो त्यावेळी तो बाहेरील जगाच्या संपर्कात येतो, आणि त्याला विपरित गोष्टींचे ज्ञान होते. या परस्पर विरोधी गोष्टींमुळे त्याच्यावर नकारार्थी परिणाम होतात. घरामध्ये सुरक्षितता आणि प्रेम त्याला

मिळते. परंतु बाहेरील जग वैरभावाने भरले आहे हे त्याच्या लक्षात येते. त्याच्या मनात वैचारिक गोंधळ होतो. जे वास्तव आहे याचे त्याला आकलन होत नाही. आपल्या मुलांसाठी मातेचे हृदय निर्मात्याने पराकोटीच्या प्रेमाने भरलेले आहे. मुलांना प्रेम आणि संयम याचे शिक्षण मिळावे, त्यांना योग्य मार्ग दाखविण्यात यावा आणि अडचणींवर मात करण्याचे सामर्थ्य त्यांच्यामध्ये निर्माण व्हावे हा मातेच्या प्रेमाचा उद्देश आहे. परंतु बहुतेक माता मुलांचा फाजील लाड करण्यामध्ये या प्रेमाचा उपयोग करतात आणि त्यांना मार्गभ्रष्ट करतात.यामुळेच संपूर्ण मानवी समाज विकृत माणसांच्या जंगलात परिवर्तित होतो.

## १४) जीवनाचा उद्देश

एकदा प्रवासात माझी एका सुशिक्षित मुस्लिम व्यक्तीबरोबर भेट झाली. त्याच्याकडे प्रशस्त घर होते. परंतु त्यात राहाण्यासाठी कोणी नव्हते. त्याला एक मुलगा आणि एक मुलगी असल्याचे त्याने सांगितले. त्यांना चागंले शिक्षण दिले होते. शिक्षणानतंर ते परदेशात गेले आणि तेथील नागरिकत्व स्वीकारले. मी त्याच्या पत्नीला विरचारले, 'तुम्हाला त्यांची आठवण येते का? त्यावर तिने उत्तर दिले, ते जेथे आहेत तेथे सुखी आहेत.' अनेक पालक आपल्या मुलांना चांगले शिक्षण देतात, परंतु नंतर ते एकाकी पडतात. पालक त्यांच्या प्रशस्त आलीशान घरांमध्ये राहतात. परंतु त्यांचे जीवन आंनदी नसते. अती श्रीमंत लोकांची हीच कथा आहे. ते पैसा कमवतात, स्वतःसाठी यशस्वी जीवन घडवतात. परंतु आशाआकांक्षाने त्यांचे जीवन नंतर उद्ध्वस्त होते. जीवानात कोणतेही ध्येय़ ठेवले नाही तर त्याची हीच परिणती होते. आपल्या मुलांना सुखी ठेवावे हेच त्यांचे ध्येय असते. परंतु ज्यावेळी पुढे मुले त्यांना एकाकी सोडून जातात त्यावेळी त्यांच्यापुढे कोणतेच ध्येय नसते. आंतरिक श्रद्धेवर आयुष्यातले ध्येय अवलंबून असते. लोकांची उपस्थिती अथवा अनुपस्थिती यावर ते अवलंबून नसते. स्वतःचे जग घडवण्यासाठी पुरुष आणि स्त्री विवाहबद्ध होतात. परंतु परस्परांबद्दल उत्कट प्रेमाच्या अभावामुळे आपल्या मुलांना ते आपल्या जीवनाचे केंद्र बनवितात. शिक्षण ही जबाबदारी आहे. ते आयुष्याचे ध्येय नाही. विवाहाचा हेतु पालकांच्या लक्षात आला तर ते आपल्या

आयुष्याचे योग्य नियोजन करतील. त्यामुळे नंतरच्या निराशेपासून ते सुरक्षित राहातील.

## १५) महिलांचे महत्व

एक म्हण आहे ''सर्व महान कार्याच्या प्रारंभी महिला असते. ''There is a woman at the beginning of all great things''

विज्ञानात एक हजाराहून अधिक संशोधन करणारा वैज्ञानिक थॉमस अल्वा एडिसन (१९३१) याची आई नान्सी अल्वा एडिसन हे याचे एक उदाहरण आहे. जगभरातील महान शास्त्रज्ञांच्या यादीत थाँमस एडिसनचे नाव समाविष्ट आहे. यासाठी नान्सी एडिसनने खूप कष्ट घेतले. ती एक शिक्षिका होती. लहानपणापासूनच एडिसनचे कान बधिर होते. त्याला नीट ऐकू येत नव्हते म्हणून शाळेतून काढून टाकण्यात आले होते. परंतु त्याच्या आईने कच खाल्ली नाही. मुलाच्या शिक्षणाची सर्व जबाबदारी तिने घेतली. घरातच शिक्षण दिले. त्याच्या शिक्षणाच्या सर्व गरजा तिने पुरविल्या. एडिसन याने त्याच्या आयुष्यातल्या आईच्या या योगदानाची पोचपावती दिली. तो म्हणतो, ''शिक्षणाचे प्रेम आणि ध्येय यांनी तिने मला प्रेरित केले. She instilled in me the love and the purpose of learning'' प्रत्येक महिला एडिसनच्या आईसारखी होऊ शकते.प्रत्येक महिला ही भूमिका बजावण्यासाठी सक्षम आहे. मात्र निर्मात्याने तिला दिलेली क्षमता तिच्या लक्षात आली पाहिजे आणि निर्धारपूर्वक तिने त्याचा उपयोग केला पाहिजे. यासाठी संयम असणे आवश्यक आहे.निर्मात्याने सामर्थ्य दिले आहे याचा संबंधित व्यक्तीने लाभ घ्यावयाचा आहे. एडिसनच्या मातेप्रमाणे अशी महिला फार महत्वाची भूमिका बजावू शकते.

## १६) लिंगभेद

दिल्लीमध्ये माझी एका निवृत्त न्यायाधीशांबरोबर भेट झाली. त्यांनी विचारले, ''मौलाना साहेब, इस्लाममध्ये सर्वाधिक कमकूवत बाब कोणती हे तुम्हाला माहित आहे? लिंगसमानता इस्लामला मान्य नाही.''

अशा प्रकारच्या संकल्पना आधुनिक माणूस अमान्य करतो. आधुनिक युग लिंगसमानतेचे युग आहे ही संकल्पना जगातील बहुतेक लोक मान्य

करतात. मात्र या संकल्पनेचा संदर्भ लिगभेदाशी आहे. संपूर्ण जग भेदावर आधारित आहे. या नियमाला स्त्री व पुरुष अपवाद नाहीत. भेद असणे ही नकारार्थी बाब नाही. ही एक वस्तुनिष्ठ बाब आहे. पुरुष व स्त्री यांची तुलना गाडीच्या दोन चाकांबरोबर करता येईल. निर्मात्याने पुरुष व स्त्री यांच्यामध्ये जैविक व मानसिक भेद ठेवला आहे. अशा प्रकारे भेद ठेवण्याचा हेतू दोघे एकदुसऱ्याचे साथीदार आहेत. दोघेही एकमेकांना पूरक आहेत. लिंगसमानतेची संकल्पना ही अनैसर्गिक संकल्पना आहे. त्यामुळे दोघांमध्ये कारण नसताना संघर्ष निर्माण होतो. एकमेकांना पूरक व साह्यय्यक असणे हेच या भेदामागचे रहस्य आहे. यामुळे जीवनाची गाडी पुरुष व स्त्री या दोन चाकावर चालू शकते.

## १७) घर एक संस्था

व्यावहारिक कारणासाठी समान वर्गाच्या कुटुंबांमध्ये विवाह होतो. अशा परिस्थितीत तडजोड करणे सोईचे आहे. त्यातच सुखी जीवनाची शाश्वती असल्याचे आपणास दिसून येते. वास्तविक पाहाता ही एक कल्पना आहे. आपण जवळून पाहिले किंवा बारकाईने निरीक्षण केले तर या प्रकारचे विवाह तेवढेच त्रासदायक होऊ शकतात आणि म्हणून समानता ही वैवाहिक जीवनातील यशाची हमी नाही. व्यवस्थापनाची कला जाणून घेणे यावरच विवाहाचे यश अवलंबून आहे. विविध पार्श्वभूमी असणाऱ्या, सुशिक्षित असणाऱ्या जोडप्यांचा विवाह यशस्वी होत नाही असे समजण्यात येते. प्रादेशिक, आर्थिक परिस्थिती इत्यादी बाबींदेखील चुकीचे अनुमान आहेत. घर ही एक परिपूर्ण संस्था म्हणून चालविण्यासाठी आवश्यक आहे. हा सोईस्कर मार्ग आहे. पुरुषांनी व स्त्रीयांनी वेगवेगळ्या विभागांमध्ये आपल्या क्षमतेप्रमाणे काम हाती घ्यावे व स्वतंत्रपणे एक दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप न करता एक दुसऱ्याचे काम करावे. कामाच्या या विभाजनामुळे असमानतेचा प्रश्न सुटू शकतो.

## १८) एकपत्नीत्व आणि बहुपत्नीत्व

पवित्र कुरआनमध्ये म्हटले आहे की (४.३) पुरुष चार स्त्रीयांशी लग्न करु शकतो. याचा अर्थ प्रत्येक पत्नीने चार पुरुष करावेत असे नाही. सर्वसामान्य नियम असा आहे की, एकच पत्नी असावी. मात्र गरज असल्यास

पुरुष एकाहून अधिक पत्नी करु शकतो. ही गरज परिस्थितीवर अवलंबून आहे. काही दुर्दैवी परिस्थितीमुळे समाजामध्ये पुरुष स्त्री यांच्यात मतभेद होतात. ज्यावेळी पुरुषांपेक्षा स्त्रीयांची संख्या जास्त होते त्यावेळी लैंगिक अनारकी उद्भवते. एक पुरुष व एक स्त्री यांच्यामध्ये विवाह ही नैसर्गिक बाब आहे. कारण पुरुषाच्या मनात दुसऱ्या पत्नीबद्दल द्वेषभावना असते व म्हणून एकपत्नीत्व हे नैसर्गिक आहे हे सिद्ध करण्यासाठी पुरेसे आहे. पण अपवादात्मक नियम हे अपवादात्मकच असतात. ते सर्वसाधारण होऊ शकत नाहीत.

## १९) प्रेमभंग

प्रेमविवाहाचे प्रमाण वाढत चालले आहे. प्रेमविवाहात यशस्वी विवाहाचा Formula सापडला आहे असे लोकांना वाटते. आपल्या पसंतीनुसार आपण विवाह करु शकतो. घरसंसार उभारु शकतो असे त्यांना वाटते. पण अनुभवाने वेगळेच काही सिद्ध होते. आज जगभरात बहुतेक लोक आपल्या पसंतीने विवाह करतात. पण सर्वेक्षणानुसार ५०% प्रेमविवाह अयशस्वी ठरतात असे निदर्शनास आले आहे. यात बहुतेक घटस्फोटांचे प्रकार आहेत. सुखी व वैवाहिक जीवनाची हमी देणारे प्रेमविवाह अयशस्वी ठरलेले आहेत. प्रेमविवाह अयशस्वी का होतात? प्रेमविवाह अत्यंत चांगला व सुंदर शब्द आहे. मात्र पुरुष व स्त्रीचे एकत्रित येणे नैसर्गिक नाही. शारीरिक आकर्षणामुळे पुरुष व स्त्री एकत्र येतात. अर्थात जे चमकते ते सर्व सोने आहे असे नसते. हे प्रेमविवाह करणाऱ्या लोकांच्या नंतर लक्षात येते व त्यांना वस्तुस्थितीशी मुकाबला करावा लागतो. विवाहापूर्वीचे प्रकरण अनेक बाबतीत फसवे असते व विवाहानंतर सुरुवातीची फसवणूक लुप्त होते. त्यावेळी सत्य परिस्थिती समोर येते. विवाहापूर्वी असामान्य असे वाटते मात्र विवाहानंतर सामान्य आहे याची जाणीव होते. त्यामुळे नैराश्य व कटुता निर्माण होते. विवाहाचे प्रकरण आईवडिलांवर सोपविणे चांगले. मात्र मुलांचा प्रतिसाद मिळाल्यानंतरच आईवडिलांनी निर्णय घ्यावा.

## २०) आईवडिलांची भूमिका

माझ्या अनुभवामध्ये आईवडिलांचे चुकीचे धोरण हे सर्वात मोठे कारण

आहे. आपल्या मुलीच्या विवाहासाठी आईवडिल पैशाची उधळपट्टी करतात. हे पवित्र कुरआनच्या शिकवणी विरुद्ध आहे. (१७।२७) मध्ये हे कृत्य सैतानी कृत्य आहे असे स्पष्ट केले आहे. भवितव्यात आपण कसे राहावे याची मुलींना शिकवण देणे हे आईवडिलांचे काम आहे. त्यामुळेच त्यांचे जीवन सुखी होईल. अनेक मातापिता आपल्या मुलींचे लाड करतात. परंतु त्यांना खरे प्रेम ते देऊ शकत नाहीत. मुली आपल्याबरोबर राहाणार नाहीत हे आईवडिलांनी लक्षात घेतले पाहिजे. मुलगी एक दिवस विवाहित होते. आईवडिलांच्याबरोबर तिचे राहाणे अल्पावधीसाठी आहे. स्वत:च्या घरची परिस्थिती व दुसऱ्या घरातील परिस्थिती यात फरक असतो हे सर्वांना माहित असते. वेळ येईल त्याप्रमाणे मुलींना आपल्या नवीन घराशी जुळवून कसे घेता येईल याची शिकवण देणे हे आईवडिलांचे कर्तव्य आहे. त्यामुळे त्या आपल्या पतींशी प्रामाणिक राहातील. माझ्या अनुभवानुसार ९९% मातापिता याबाबत अपयशी आहेत. याची किंमत आयुष्यभर मुलींनाच द्यावी लागते. ज्यावेळी नवीन परिस्थितीशी मुलींना जुळवून घेता येत नाही त्यावेळी आपले नवीन घर आपल्या हृदयात समावू शकत नाहीत. आपल्या आईवडिलांच्या घरचाच त्या विचार करत राहतात. पतीच्या घरापेक्षा आईवडिलांचे घर त्यांना चांगले वाटते. लग्न झाल्यावरही असे आईवडिल आपल्या मुलीच्या जीवनात हस्तक्षेप करत असतात. हे खरे प्रेम नव्हे.

## २१) स्त्री शिक्षण

शिक्षण हे पुरुषांप्रमाणे स्त्रियांसाठीही महत्वाचे आहे. शिक्षणाअभावी दोघेही अपरिपक्व राहतात. शिक्षण ही गरज आहे. त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. आयुष्यात मोठे ध्येय गाठण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. शिक्षण नसल्यास त्यापासून स्त्री अथवा पुरुष वंचित राहातात. कोणतेही ध्येय गाठण्यात ते असमर्थ राहतात आणि जीवनामध्ये नैराश्याची भावना निर्माण होते. पुरुष व स्त्री या दोघांसाठी शिक्षण हे महत्वपूर्ण आहे. ते न होण्यामध्ये कोणतेही कारण पुढे येऊ नये. शिक्षण हे नोकरी मिळविण्यासाठी नाही, तर स्वत:चे जीवन चांगले घडविण्यासाठी आहे. आज जीवनामध्ये प्रत्येक ठिकाणी शिक्षणाला महत्व आहे. कोणीही अशिक्षित राहू शकत नाही. अशिक्षित राहिल्यास परीपूर्ण जीवनापासून मानव वंचित राहातो. मानव हा एखाद्या

प्राण्याप्रमाणे आहे. प्राण्यापेक्षा मानवाचा दर्जा उच्च आहे. दोन्हीमध्ये शिक्षण हाच महत्वाचा भेद आहे. आपल्यामधील क्षमता मनुष्य जाणून घेऊ शकतो व त्याला तो वास्तवात परिवर्तित करु शकतो. शिक्षणाशिवाय हे शक्य नाही. याठिकाणी शिक्षण म्हणजे उच्च शिक्षण अथवा धंदे शिक्षण नव्हे. उच्च शिक्षणात नोकरीची हमी आहे. याउलट सर्वसमावेशक शिक्षणाद्वारे जगाचे ज्ञान प्राप्त होते आणि बौद्धिक विकास होतो. ज्ञान व बौद्धिक विकासामुळे सुशिक्षित व्यक्ती मानवतेच्या उच्च ठिकाणी पोहोचतो.

## २२) तडजोड

एका सुशिक्षित मुस्लिमाने एका तरुण पाश्चिमात्य व्यक्तीबरोबर आपल्या मुलीचा विवाह केला. लग्नानंतर मुलगी आपल्या पतीच्या घरी गेली. काही वर्षे ती तिथेच राहिली. त्यांना मुलगा झाला. पण काही दिवसांनी पतीशी मतभेद झाले. मुलीला राग आला. नवऱ्याला सोडून ती आपल्या आईवडिलांकडे परत आली. मुलीने केलेल्या तक्रारीवर वडीलांचा विश्वास बसला आणि सर्व दोष मुलाचा आहे असे त्यांना वाटले. ज्यावेळी मी वडिलांना भेटलो, सर्व कथा ऐकली त्यावेळी मी म्हणालो, 'जे बोलत आहे ते पित्याचे हृदय आहे.' ते म्हणाले, 'जावयाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, परंतु तो ऐकत नाही. तो म्हणतो, तुमच्या मुलीने माझ्याशी तडजोड करावी.'

मी म्हणालो, ''वैवाहिक जीवनात अशा प्रकारचे मतभेद होत असतात. मतभेद दोन प्रकारचे असतात. ते म्हणजे पतीला काहीतरी व्यसन असते. उदा. मद्यपान इ. अथवा स्वभावदोष. जावयामध्ये अशा प्रकारच्या सवयी नाहीत. आणि म्हणून या प्रकरणावर गांभीर्याने विचार करुन मुलीला तिच्या पतीबरोबर तडजोडीची शिकवण द्यावी. आपल्या नवऱ्याचा गैरसमज तिने दूर करावा. हा एकच पर्याय आहे. दुसरा पर्याय नाही. तुम्ही प्रबोधनकार आहात. प्रबोधनकार हा वैचारिक बैठक असणारा माणूस असतो. तुम्ही तुमच्या मुलीची समजूत काढून तिला पतीबरोबर तडजोड करण्याचा सल्ला द्या. अन्यथा तुमचे जीवन संपुष्टात येईल. तुम्ही एक प्रबोधनकार पिता म्हणून राहाणार नाही.''

## २३) बाबुलकी दुवा

मोहम्मद रफी (१९८०) प्रसिद्ध गायक होते. त्यांनी हजारो गीत गायले

आहेत. ते लोकप्रिय आहेत. एक गीत असे आहे की गाताना ते स्वत:च रडू लागले. मुलगी आपल्या सासुरवाडीच्या घराकडे विवाहानंतर जात आहे. ''बाबुलकी दुवायें लेती जा'' तुमच्या वडीलांच्या प्रार्थना तू सोबत घेऊन जा, अशी या गीताची पार्श्वभूमी आहे. तुला सासुरवाडीत भरपूर सुख मिळावे. प्रार्थना करतो, तुला इतके प्रेम मिळावे की तू आई वडीलांचे घर विसरुन जावेस''.

मात्र ही सदिच्छा नैसर्गिक नियमावलीच्या विरुद्ध आहे. या जगात कोणासही सदैव आराम आणि प्रेम मिळत नाही. प्रेम आणि आराम यशस्वी वैवाहिक जीवनाचे निकष असतील, तर ते यतार्थ नाहीत आणि या प्रकारचे यतार्थ नसलेले ध्येय प्राप्त करणे शक्य नाही. अनेक लोकांचे हे मत आहे, त्यामुळे त्यांच्या मृत्युपर्यंत त्यांचे जीवन दु:खी राहाते. जर त्यांना जीवनाचे सत्य उमगले असते तर त्यांनी वेगळ्या पद्धतीचे जीवन व्यतीत केले असते. मुलांनाही त्यांनी तशीच शिकवण दिली असती. आईवडिलांनी जर आपल्या मुलीना 'जीवनाचे 'सत्य' समजून सांगितले असते आणि भावी आव्हानाला सामोरे जाण्यासाठी त्यांची तयारी केली असती, तर परिस्थितीत बदल झाला असता.

पुरुष आणि स्त्री दोघांसाठी जीवन हे आव्हान आहे. ज्यांना याची कल्पना आहे ते हे आव्हान म्हणजे प्रगतीची शिडी आहे असे समजतात. आणि ही शिडी चढून त्यांच्या नशिबात आहे त्या उच्च ठिकाणी ते पोहोचतात. व्यावहारिक आनंद म्हणजे सुख नाही. परिस्थितीशी जुळवून घेण्याचे रहस्य ओळखणे यातच सुख आहे.

## २४) यशाचे रहस्य

पौर्वात्य जगात विवाहानंतर मुलगी माहेर सोडून जाते आणि पतीच्या घरी राहू लागते. आपल्या पतीच्या घरी राहात असल्या तरी बहुतेक स्त्रीयांना माहेरचेच आकर्षण असते. अर्थात ही विचारसरणी अस्वस्थ करणारी आणि वस्तुस्थिती अनुरुप नाही.

जीवनाचे सत्य काय आहे? याची मुलींना जाणीव करुन देणे ही आईवडिलांची जबाबदारी आहे. मात्र त्याकडे आईवडिल दुर्लक्ष करतात. ज्यावेळी समस्या निर्माण होते, त्यावेळी आईवडिल मुलींची बाजू घेतात.

त्यामुळे त्यांच्या मनात प्रामाणिकपणाची भावना निर्माण होते. अशाप्रकारचे प्रेम म्हणजे शोकांतिका ! कारण आईवडिलांच्या मृत्युनंतर जीवनाच्या वास्तवाबरोबर मुलींनाच संघर्ष करावा लागतो.

माझ्या लक्षात आहे की, लग्नानंतर एका गृहस्थाने आपल्या मुलीस पुढीलप्रमाणे उपदेश केला होता. ''तू जिथे जात आहेस, तेच तुझे घर! आता तुझी सासू ही तुझी आई आणि तुझे सासरे हे तुझे वडील! तुझ्या कल्याणासाठी आम्ही प्रार्थना करत राहू. पण आता तुझे घर आणि तुझे आईवडिल बदलले आहेत.'' या प्रामाणिकपणे केलेल्या उपदेशामुळे मुलगी सासरचे घर हे आपले घर समजू लागली. माहेरी मिळणारे सर्व सुख आणि सुरक्षितता तिला सासरच्या घरी मिळू लागले.

वास्तववादी असणे ही जीवनाच्या यशाची गुरुकिल्ली आहे. चुकीच्या विचारसरणीमुळे जीवनामध्ये अनेकविध समस्या निर्माण होतात. हे ज्याच्या लक्षात आले तो आपले जीवन आनंदी बनविण्यात यशस्वी होतो.

## २५) माहेर-सासर मतभेद

रक्ताच्या नात्यामुळे, एकदुसऱ्यावर प्रेम करणे ही गोष्ट सुलभ आहे. विशेषत: आईवडिल आणि मुलांबाबतीत हे सत्य आहे. जरी मुलाने आपल्या आईवडिलांचे प्रेम परत केले नाही तरी त्याला मात्र सतत प्रेम मिळत जाते.

सासुसासऱ्यांचे नाते संपूर्णत: वेगळ्या प्रकारचे नाते आहे. सून अशा लोकांमध्ये राहाते ज्यांच्याशी तिचे रक्ताचे नाते नाही. आईवडिलांच्या घरी तिला मिळणारे प्रेम बिनशर्त आणि अनिर्बंध असते. याउलट सासुरवाडीत द्या आणि घ्या 'Give & Take' ही प्रथा असते. याचाच अर्थ असा की, जर देण्याची इच्छा नसेल तर त्याला काही मिळणार नाही.

माहेर आदर्श आहे आणि सासर हे त्याहून कमी आदर्श आहे असे. स्त्रियांना वाटते. या विचारसरणीमुळे स्त्रीलाच त्रास होतो आणि आपले सासुसासरे आणि पती यांच्याबरोबर नाते प्रस्थापित करण्यात तिला अपयश येते. निर्मात्याने पुरुष आणि स्त्री यांना भिन्न क्षमता बहाल केल्या आहेत. त्यामुळे प्रत्येकजण आपली भूमिका बजावण्यात यशस्वी होतात. त्यांच्यातील क्षमतांचा त्यांना उपयोग होत नाही.

जगामध्ये कोणतीही भूमिका पार पाडण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे.

आवश्यक आहे. घर ही एक संस्था आहे. एकत्रित प्रयत्न करणे. संस्था यशस्वीपणे चालविण्यासाठी आवश्यक आहे. घरातील लोकांनी हे समजून घ्यावे आणि त्याप्रमाणे प्रयत्न करावेत. विशेषत: त्या घरातील महिलेने कारण महिला ही घरचा मूळ पाया आहे. ती परिणामकारकरित्या आपली भूमिका पार पाडू शकते आणि सासरचे घर स्वत:चे घर आहे असे समजते. घर एक सामाजिक संस्था आहे असे जे समजतात तेच लोक अशा प्रकारची कृती करु शकतात.

## २६) संयुक्त कुटुंब

विवाहानंतर संयुक्त कुटुंबात राहावे की विभक्त राहावे असा प्रश्न मनात उद्‌भवतो. शरियतमध्ये याबद्दल काही सांगण्यात आलेले नाही. आपल्या सोयीनुसार प्रत्येकाने कौटुंबिक व्यवस्थेची निवड करावी. माझ्या अनुभवानुसार जर पतीपत्नी समजदार असतील तर संयुक्त कुटुंब प्रत्येक बाबतीत फायदेशीर आहे.

प्रत्येक घराच्या विविध गरजा असतात. यशस्वीपणे घराची रचना करण्यासाठी अनेक गरजा पूर्ण कराव्या लागतात. याबाबतीत संयुक्त कुटुंब अधिक प्रभावी आहे असे वाटते. विभक्त कुटुंबामध्ये दोनच व्यक्ती असतात. पती आणि पत्नी. परंतु ज्यावेळी मुलांचा जन्म होतो, त्यावेळी एक दुसऱ्यांची काळजी घेणे आणि सर्व घराची काळजी घेणे भाग पडते. विभक्त कुटुंबात पतीपत्नींना स्वत:च सर्व काही करावे लागते. याउलट संयुक्त कुटुंबात घर चालविण्यासाठी सर्व सदस्य काम करत असतात आणि एकमेकांना मदत करत असतात. प्रत्येकासाठी हे फायदेशीर आहे, परंतु प्रत्येक गोष्टीसाठी काही किंमत मोजावी लागते. संयुक्त कुटुंबामध्ये प्रत्येकास सलोख्याने वागावे लागते. मतभेद टाळावे लागतात आणि अप्रिय घटनांपासून दूर राहावे लागते. यशस्वी संयुक्त कुटुंब पद्धतीमध्ये हे अनिवार्य आहे आणि म्हणून ज्यांना सलोख्याने जीवन व्यतीत करावयाचे आहे त्यांनी संयुक्त कुटुंब पद्धतीचा अवलंब करावा. दोन्ही प्रकारच्या कुटुंब पद्धतीत काही त्रुटी आहेत. संयुक्त कुटुंब पद्धतीमध्ये प्रत्येकास आपला अहंकार सोडून द्यावा लागतो. जर तसे केले नाही तर या पद्धतीचे फायदे मिळणार नाहीत. एकाच वेळी कोणालाही दोन्ही गोष्टी मिळत

नसतात.

## २७) सासु आणि सून

प्रत्येक संयुक्त कुटुंबात सासु आणि सून यांच्यामध्ये मतभेद असतात. ते निरर्थक असतात. ही समस्या मानसिकतेमुळे उद्‌भवते. मात्र एकाच पद्धतीच्या विचारसरणीने दुसऱ्या पद्धतीच्या विचारसरणीचा बिमोड करता येतो.

एक घर आहे, त्यामध्ये एक पलंग आहे. आई त्यावर बसलेली आहे. अशावेळी मुलगी बेशिस्तपणे पलंगावर पहुडली तर ते स्वाभाविक आहे असे समजले जाते. परंतु सासूच्या समोर सुनेने असे केले तर ती अनादर करत आहे असे समजले जाते. अशाप्रकारे विशिष्ट विचारसरणीमुळे समस्या निर्माण होते. सासू आपल्या सुनेला आपली मुलगी आहे असे समजत नाही आणि सून सासूला आपली खरी आई आहे असे समजत नाही. जर दोघांनी आपली विचारसरणी बदलली, तर कुटुंबामध्ये प्रेम आणि शांततेचे वातावरण निर्माण होईल. कोणतीही समस्या उद्‌भवणार नाही. निर्मात्याने नैसर्गिक नियमावली बनवली आहे. प्रत्येक मुलगी त्या नियमानुसार सून होते आणि प्रत्येक आई सासू होते आणि म्हणून या नियमावलीशी प्रत्येक स्त्रीने जुळवून घेतले पाहिजे. असे न केल्यास तिच्याकडून निर्मात्याची अवज्ञा होईल. या समस्या केवळ मानवाशी निगडित नाहीत. तर मनुष्य आणि त्याचा निर्माता यांच्यामध्ये असलेली ही बाब आहे. या कारणासाठी जी उपाययोजना सुचविण्यात आली आहे त्याकडे गांभिर्याने पाहावे. नाहीतर निर्मात्याचा राग ओढवून घेतल्यासारखे होईल. निर्मात्याखेरीज समस्त विश्वावर कोणाचे अधिपत्य आहे ?

## २८) एक निरीक्षण

माझ्या अमेरिका भेटीच्या वेळी एका मुस्लिम जोडप्याने मला निमंत्रण दिले. पत्नीचा जन्म पाकिस्तानात झाला होता आणि तेथेच तिचे पालनपोषण झाले होते. विवाहानंतर ती अमेरिकेस आली होती.

एके दिवशी पती कामासाठी बाहेर गेल्यानंतर पत्नी रडत माझ्याकडे आली. ती इतक्या मोठ्याने रडत होती की, ती मला काही सांगू शकली नाही. दुसऱ्या दिवशी तिने मला सांगितले, ''माझा पती माझ्यावर नाराज आहे. मी आईवडिलांकडे परत जाण्याचा विचार करत आहे.''

तिच्या या वक्तव्यामुळे मी विचार करु लागलो. समस्या काय आहे? हे समजण्याचा मी प्रयत्न केला. अखेरीस तिचे आईवडिलच जबाबदार आहेत असा निष्कर्ष मी काढला. तिच्या आईवडिलांनी तिचा इतका लाड केला होता की, तिच्या घरची व्यवस्था पाहाण्यास ती असमर्थ होती. माहेरी असताना तिला तसे प्रशिक्षण मिळाले नव्हते. विवाहानंतर वेगवेगळया वातावरणात ती आपल्या पतीची आणि नव्या घराची काळजी घेण्यास असमर्थ होती. त्यामुळे वैवाहिक जीवनात कटुता निर्माण झाली. भारत आणि पाकिस्तान यासारख्या देशांमध्ये घरगुती मदत सहज मिळते. अमेरिकेतील जीवन मात्र याहून अगदीच वेगळे आहे. ज्याला काहीच करण्याचा सराव नाही त्याच्यासाठी तर ते अधिकच कठीण. दोन देशातील हा भेद पत्नीसाठी आणि नव विवाहितांसाठी समस्या होऊन बसली आहे. जीवनाच्या सत्य स्थितीपासून आईवडील मुलीचा बचाव करत राहिले आणि तेच तिच्या दु:खाचे कारण ठरले.

## २९) मानसिकतेचा बिमोड

एक पुरुष व एक स्त्री विवाहबद्ध होतात म्हणजे दोन भिन्न व्यक्तिमत्व एक दुसऱ्याच्या सहवासात येतात. अनेक बाबतीत ते आगळेवेगळे असतात. त्यांची जीवनशैली आणि पालनपोषण यांच्या भिन्नतेनुसार दोघांच्या मानसिकतेची जडणघडण झालेली असते.

मूल जन्माला आल्यानंतर ज्या वातावरणात ते वाढते त्याप्रमाणे त्याची मानसिकता घडत जाते. घरातील आणि घराबाहेरील वातावरणात तो मोठा होतो. त्याचे हे व्यक्तिमत्व त्याच्या आयुष्यात अखेरपर्यंत टिकून राहाते. परिणामत: त्याचे विचार बरोबर आहेत असा त्याचा ग्रह होतो. प्रत्येकाच्या बाबतीत असे घडत असते आणि म्हणून ज्यावेळी एक पुरुष आणि एक स्त्री विवाहबद्द होतात त्यावेळी अशा प्रकारची मानसिकता एक समस्या होते. एखाद्या गोष्टीकडे पाहण्याचा पुरुषाचा आणि स्त्रीचा दृष्टीकोन वेगळा असतो. त्यामुळे दोघांमध्ये मतभेद होतात आणि हे मतभेद वाढत जातात.

एक दुसऱ्याच्या मानसिकतेचा बिमोड करणे हे या समस्यांसाठी एकमेव उपाय आहे. ज्यावेळी एकजण आपले मन मोकळे करुन दुसऱ्याबरोबर बौद्धिक निकषावर चर्चा करतो त्याचवेळी हे शक्य होते. मानसिकतेचा बिमोड

करण्यासाठी स्वत:च्या चुका कबूल करणे आवश्यक आहे आणि हाच यशाचा खरा मार्ग आहे.

## ३०) सर्वाधिक मोठी कृपा

''चांगले चारित्र्य असलेली स्त्री ही जगामध्ये असलेल्या सर्व चांगल्या गोष्टींमध्ये सर्वोत्कृष्ट आहे,'' असे प्रेषितांनी म्हटले आहे.

याचाच अर्थ असा की, प्रत्येक स्त्री नैसर्गिक क्षमता घेऊनच जन्माला येते. प्रत्येक पुरुषाने ही क्षमता लक्षात घेतली पाहिजे. धातू माणसास निसर्गाने बहाल केलेले वरदान आहे. धातूपासून मौल्यवान पोलाद बनवणे ही माणसाची जबाबदारी आहे. यासाठी सर्वप्रथम पुरुषाने स्त्रीस उपयुक्त समजावे. त्याने तिचे चारित्र्य आणि तिच्यामधील सुप्त बुद्धिमत्ता पाहावी. स्त्रीमध्ये उपयुक्त क्षमता आहे. या क्षमतेस मूर्त स्वरुप देणे हे पुरुषाचे काम आहे. अन्यथा त्याचा विनाश होईल.

आपली पत्नी ही निर्मात्याने बहाल केलेले बक्षिस आहे असे पुरुषाने लक्षात घेतले तरच ही प्रक्रिया शक्य आहे. निर्मात्याने त्याच्यासाठी केलेली निवड कधीही चुकीची असू शकत नाही यावर त्याचा दृढ विश्वास बसेल. समस्त विश्वासाठी निर्मात्याने केलेली निवड अचूक आहे. हे लक्षात आल्यास पुरुष आपल्या पत्नीस 'मौल्यवान' करण्यासाठी काहीही करु शकेल.

प्रत्येकास चांगली पत्नी हवी असते. मात्र चांगली पत्नी तयार वस्तूंप्रमाणे उपलब्ध नसते. तिच्यामध्ये बदल घडविण्यासाठी पुरुषास आपली भूमिका पार पाडावी लागते. ही भूमिका पार पाडण्यासाठी पुरुषामध्ये अंत:करणापासून शुभेच्छा, संयम आणि सहिष्णुता हे गुण असणे आवश्यक आहे.

## ३१) नकारात्मक विचार

प्रेषित मोहम्मद यांनी कौटुंबिक जीवनासंबंधी जे सांगितले आहे, त्याचे वर्णन अबू हुरैरा यांनी पुढील शब्दांत केले आहे.

''श्रद्धावंत पतीने आपल्या श्रद्धावंत पत्नीबाबतीत नकारात्मक विचार ठेऊ नयेत. जर त्याला तिचा एखादा गुणविशेष आवडला नाही तरी तिचे इतर गुणविशेष आवडतील.'' (सही मुस्लिम)

कोणताही पुरुष अथवा स्त्री सर्व चांगल्या गुणांचा समुच्चय नाही ही वस्तुस्थिती आहे. सकारात्मक बाजूपेक्षा लोकांच्या नकारात्मक बाजूकडे पाहाणे ही माणसाची वृत्ती आहे. ही विध्वंसक वृत्ती आहे. चांगल्या स्नेहबंधामध्ये या वृत्तीमुळे अडथळा निर्माण होतो. जर नकारात्मक ऐवजी सकारात्मक बाजूवर आम्ही लक्ष केंद्रित केले तर दृढ स्नेहसंबध प्रस्थापित करणे शक्य आहे. आणि जर आम्ही असे केले तर आमचा जीवनसाथी सर्वोत्तम आहे हे लक्षात येईल.

निर्मात्याने कोणत्याही पुरुषास अथवा स्त्रीस गौणत्व दिलेले नाही. ती परिपूर्ण निर्मिती आहे. आमचा दृष्टिकोन चुकीचा आहे. आम्ही काही लोकांना कमी लेखतो आणि काही लोकांना श्रेष्ठ समजतो. जर आम्हाला हे उमगले तर परस्पर द्वेषभावना राहाणार नाही आणि निर्मात्याच्या निर्देशानुसार आम्हाला आमचे जीवन घडवता येईल.

## ३२) सुसंगती

विवाहात पुरुषाचे आणि स्त्रीचे एकत्र येणे ही एक अद्‌भुत घटना आहे. सृष्टीतील सर्व जैवविविधतेची जोडप्यात निर्मिती झाली आहे. परंतु पुरुष आणि स्त्री यांच्यामध्ये जी सुसंगती आहे ती दुसऱ्या सजीवांमध्ये नाही. ज्यावेळी पुरुष आणि स्त्री जीवनसाथी म्हणून एकत्र येतात त्यावेळी एका सूत्रबद्ध नियोजनानुसार त्यांची निर्मिती करण्यात आलेली आहे हे स्पष्ट होते.

ज्यावेळी जीवन साथीदारांच्या हे लक्षात येते त्यावेळी त्यांना अतीव आनंद होतो. ही एक कृपा आहे असे त्यांना वाटते. हा परस्पर आनंद टिकून राहील त्यावेळी आपणास काहीतरी अमूल्य प्राप्त झाले आहे हे त्यांच्या लक्षात येईल.

कल्पना करा! असे जग, ज्यामध्ये पुरुष नाही अथवा स्त्रीदेखील नाही. जीवन आहे, परंतु त्यात सुख अथवा आनंद नाही. यामध्ये काहीतरी चुकल्याचुकल्यासारखे आणि काहीतरी अपूर्ण आहे असे वाटेल आणि म्हणून पुरुषाखेरीज त्याचप्रमाणे स्त्रीखेरीज जग निरर्थक आहे.

या वस्तुस्थितीवर पुरुषांनी आणि स्त्रीने विचार केला, तर त्याला जे उमगेल ते त्याला एखाद्या वैज्ञानिकापेक्षा अधिक अचंभित करणारे असेल आणि

परस्पर मतभेद निरर्थक आहेत हे त्याच्या लक्षात येईल. पुरुष आणि स्त्री या निर्मात्याच्या अप्रतीम कलाकृती आहेत. विवाहामध्ये या दोन अप्रतीम कलाकृती एकत्र येतात आणि म्हणून जगात याहून अधिक महत्वाचा प्रसंग नाही.

## ३३) बुद्धिवादी साथीदार

मनुष्याने या जगात जन्म घेतला, त्यावेळी तो लोखंडाच्या कच्च्या धातूप्रमाणे होता. निसर्गाने कच्च्या धातूच्या स्वरुपात त्याची निर्मिती केली. मनुष्याला स्वत:लाच स्वत:ची प्रगती करावी लागते. निसर्ग कच्चा धातू निर्माण करतो आणि माणसास ते पोलादात परिवर्तित करावयाचे असते. विकासाच्या प्रक्रियेत बौद्धिक विकास सर्वाधिक महत्वाचा आहे. व्यक्तिमत्वाचा विकास करताना आपल्या सद्सद्विवेक बुद्धीस जागृत करुन आपले हृदय मोठे करणे सर्वाधिक महत्वाचे आहे. सद्सद्विवेक बुद्धी जागृत करण्याच्या या क्रियेसाठी तीन गोष्टी महत्वाच्या आहेत. अभ्यास, निरीक्षण आणि इतर लोकांशी बौद्धिक सुसंवाद. त्याचप्रमाणे ज्ञानार्जनासाठी ग्रंथ सर्वाधिक मोठे साधन आहे. ग्रंथवाचन हे अत्यंत फायदेशीर आहे. निरीक्षणासाठी सृष्टी फार मोठे साधन आहे. बौद्धिक शिकवणीसाठी दुसऱ्यापासून शिकण्याची सवय आणि या प्रक्रियेत सातत्य असणे आवश्यक आहे.

विवाहबद्ध लोकांच्या बाबतीत ते एकदुसऱ्यांचे बौद्धिक साथीदार आहेत. यादृष्टीने बौद्धिक विकासासाठी विवाह ही मोठी संधी आहे. यामुळे दोघेही सुसंवाद करु शकतात आणि एकत्रितपणे बौद्धिक प्रगती करु शकतात. बौद्धिकविकासास प्राधान्य देणे आणि दैनंदिन जीवनात त्यास महत्वाचे स्थान देणे आवश्यक आहे.

## ३४) परस्पर विश्वास

दोघा व्यक्तींवर एखाद्या कामाची जबाबदारी टाकली तर ते काम यशस्वीपणे पूर्ण होण्यासाठी दोघांमध्ये विश्वास असणे आवश्यक आहे. कुटुंब यशस्वी होण्यासाठी पती आणि पत्नीमध्ये परस्पर विश्वास आवश्यक आहे. पती आणि पत्नी यांच्यामध्ये विश्वास नसेल तर ते चांगले कुटुंब होऊ शकत नाही.

बहुतेक पती आणि पत्नी यांच्यामध्ये परस्पर विश्वासाचा अभाव का असतो? असा प्रश्न उद्‌भवतो. याचे कारण दोघे आपल्या नात्याशी विवाहबद्ध असूनदेखील बांधिल नसतात. त्यामुळे मानसिकदृष्ट्या पती आणि पत्नीमध्ये अडथळा निर्माण होतो. दोघांच्या नात्यामध्ये परस्पर विश्वासाचा अभाव असल्यास दोघेही त्यास कारणीभूत असतात.

नवीन कुटुंबाशी जुळवून न घेणे ही स्त्रीची चूक आहे. ती आपल्या माहेरलाच कवटाळून असते. तिच्या शब्दातून आणि कृतीतून ती सासरशी जुळवून घेत नाही हे लक्षात येते आणि त्यामुळे पतीच्या मनात संताप निर्माण होतो.

दुसऱ्या बाजूला 'आदर्श स्त्री' या कल्पनेमुळे पती पत्नीवर दबाव आणतो. हा पतीचा दोष आहे. अनेक बाबतीत पत्नी कमी पडत आहे असे त्याला वाटते आणि तो 'आदर्श स्त्री' या त्याच्या कल्पनेनुसार पत्नीचे मूल्यमापन करत असतो.

पुरुष आणि स्त्री यांच्यामध्ये परस्पर विश्वास निर्माण व्हावा यामध्ये हा फार मोठा अडथळा आहे. परस्पर विश्वास संपादन करण्यासाठी दोघांनीही आत्मपरीक्षण करावे आणि आपल्यामधील उणिवा दुरुस्त कराव्यात. ज्यावेळी पती आणि पत्नी अशी उपाययोजना करतील त्यावेळी ते चांगले व्यावहारिक जीवन जगू शकतील. मानसिक अडथळा दूर होईल आणि त्यांचे सांसारिक जीवन यशस्वी होईल.

## ३५) सौंदर्य की चारित्र्य

आपली पत्नी सुंदर असावी अशी प्रत्येक तरुणाची इच्छा असते. परंतु हा दृष्टीकोन अपरिपक्व आहे. अनेकदा ही सुंदर पत्नी वादग्रस्त ठरते. स्त्रीचे आकर्षण फार काळ टिकत नाही. आणि सुरुवातीचा मोह हवेत विरुन जातो. विवाहाच्या बाबतीत व्यक्तीच्या चारित्र्यास अधिक महत्व दिले पाहिजे. चांगले चारित्र्य असलेली स्त्री ही सर्वोत्तम जीवनसाथी बनू शकते.

फ्रँकफोर्ट विद्यापीठाचे, मानसशास्त्रज्ञ डॉ. जॉन ऑकर्ट लिहीतात. 'भपकेदार स्त्रियांना असे वाटते की, सौंदर्य हे अतिमौल्यवान आहे. वाढते वय त्यांना सहन होत नाही. हॉलिवूडची अत्यंत सुंदर म्हणून ओळखली जाणारी मर्लिन मनरोही आरशासमोर आपल्या तोंडावरील सुरकुत्या पाहून रडू लागली

असे म्हणतात.''

ज्या माणसाला चारित्र्यवान पत्नी मिळते तो भाग्यवंत! ती आयुष्यामध्ये चांगली साथीदार म्हणून आपल्या पतीबरोबर राहाते. विवाह म्हणजे खेळ नाही. योग्य जीवनसाथी मिळणे हा त्याचा हेतू आहे आणि ज्यांचे चांगले चारित्र्य आहे तो सर्वोत्तम जीवनसाथी! बाह्य सौंदर्य नव्हे ! जर त्याने वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून पाहिले तर हे सत्य उमगेल.

## ३६) 'ध' चा 'मा' !

किरकोळ कारणावरुन बहुतेक पती आणि पत्नी यांच्यामध्ये भांडण होते. हे वाद कधीकधी गंभीर स्वरुप धारण करतात. पती आणि पत्नी एकत्र राहतात. सतत एक दुसऱ्याच्या संपर्कात आल्याने संघर्ष होतो.

मतभेद निरर्थक आहेत याची पती आणि पत्नी यांना जाणीव झाली तर गंभीर वाद कधीच निर्माण होणार नाहीत.

प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव भिन्न असतो. हे नैसर्गिक आहे. एकमेकांच्या सहवासात आल्याने लोकांमध्ये मतभेद होत नाहीत. ज्यावेळी ते एकत्रित जीवनाची सुरुवात करतात त्यावेळी मतभेद निर्माण होतात. जर पती आणि पत्नी यांनी हे स्वाभाविकच आहे हे मान्य केले तर त्यांचे नाते अर्थपूर्ण होईल. आयुष्यातील बहुतेक समस्या अज्ञानातून निर्माण होतात. स्वत:चे अज्ञान ओळखले आणि त्यासाठी काही केले, तर अनावश्यक समस्येपासून त्यांचा बचाव होईल.

## ३७) एक घटना

एके दिवशी मला भारतातील एका शहरातून फोन आला. तो फोन एका महिलेने केला होता. ती म्हणाली की, तिची बहीण आणि बहिणीचा नवरा घटस्फोट घेण्याच्या तयारीत आहेत. त्यांच्यामध्ये मतभेद आहेत. ते दोघे त्याच दिवशी घटस्फोटाच्या कागदपत्रांवर सह्या करणार होते. बहिणीसाठी मी प्रार्थना करावी अशी तिने मला विनंती केली.

'बहिणीशी मला चर्चा करावयाची आहे,' असे मी तिला सुचविले. त्यानुसार आम्ही फोनवर चर्चा केली. तिने घेतलेल्या निर्णयाचे मी तिला कारण विचारले. तिच्या काही तक्रारी होत्या. घटस्फोट घेण्याइतकी समस्या गंभीर

नाही असे मी तिला सांगितले. तिच्या पतीबरोबर असलेले तिचे मतभेद निरर्थक होते. तिची तक्रार होती की, पती आपले ऐकत नाही आणि प्रत्येक वेळी तिलाच पतीचे ऐकावे लागते.

मी अनेक उदाहरणे दिली. जीवन हे दुहेरी नसते. ते एकत्रितपणे चालते आणि यास ती अपवाद नाही. या तत्त्वाला कुरआनमध्ये 'कव्वामियत' म्हणजे 'बॉसिझम' म्हणतात. ज्याप्रमाणे एखाद्या कंपनीत अथवा संस्थेत बॉस किंवा व्यवस्थापक असतो. त्याप्रमाणे प्रत्येक घरातसुद्धा बॉस किंवा व्यवस्थापक असतो. हा स्वाभाविक नियम आहे. याचा लिंगभिन्नता अथवा समानता याच्याशी काही संबंध नाही. जर आपण हे ओळखले नाही, तर घरामध्ये अथवा कोणत्याही संस्थेमध्ये शांती राहाणार नाही.

तिच्या बहीणीने माझा उपदेश ऐकला आणि ती नवऱ्याकडे परत गेली. तिने घटस्फोटाचे कागदपत्र मागे घेतले आणि आपल्या नवऱ्यास 'बॉस' म्हणून विनाअट कबूल केले. आता त्यांचे जीवन सुखी आहे.

## ३८) रागावर नियंत्रण ठेवा !

राग हे नाते बिघडवण्याचे महत्वाचे कारण आहे. रागामुळे भांडण होते आणि त्यामुळे द्वेषभावना निर्माण होते. कोणत्याही प्रकारच्या नात्यामध्ये रागामुळे कटुता निर्माण होते. राग हा एक प्रकारचा स्वभावधर्म आहे. रागावर नियंत्रण ठेवणे एवढाच त्याच्यावर उपाय आहे.

राग वाईट गोष्ट नाही. त्यावर नियंत्रण ठेवले नाही तर वाईट आहे. त्यामुळे इतरांचे जीवन खराब होते.

रागाचा क्षणार्धासाठी उद्रेक होतो. तो प्रतिकात्मक असतो. थोड्या वेळासाठी भडकलेल्या अग्नीप्रमाणे असतो. आणखी इंधन दिले नाही तर आपोआप विझतो. लोकांच्या हे लक्षात आले तर अधिक कटुता निर्माण होणार नाही. राग व्यक्तीच्या मनातील अग्नीसारखा असतो. वाईट शब्द अथवा वाईट अनुभव यामुळे या अग्नीचा भडका होतो. हा भडका क्षणिक असतो आणि म्हणून ज्यावेळी आपणास राग येतो त्यावेळी आपण आपल्या जिभेवर नियंत्रण ठेवावे अथवा विचारांची दिशा बदलावी आणि राग शांत होईपर्यंत प्रतीक्षा करावी. रागावर नियंत्रण ठेवणे अतिशय महत्वाचे आहे.

## ३९) थांबा !

एक जुनी म्हण आहे. ''थांबा आणि पाहा!'' ''Wait and Watch'' थांबणे म्हणजे चांगल्या भवितव्याची प्रतीक्षा करणे. आज आम्हाला जे मिळाले नाही ते उद्या मिळेल याची प्रतीक्षा करणे ही एक शहाणपणाची गोष्ट आहे.

विवाहामध्ये पहिल्याच दिवसापासून आपल्या अपेक्षेप्रमाणे साथीदाराने राहावे असे पती आणि पत्नी दोघांना वाटते, हे चुकीचे आहे. जुळवून घेण्यासाठी एकमेकांना वेळ देणे आवश्यक आहे. मात्र याकडे दुर्लक्ष केले जाते. निर्धारित वेळेपूर्वी काहीच घडत नसते, हे सर्वश्रुत आहे. उद्यापर्यंत जे मिळणार नाही ते या जगात आजच मिळेल हे शक्य नाही.

ज्यावेळी पुरुष आणि स्त्री विवाहबद्ध होऊन एकत्र येतात. त्यावेळी त्यांना एक नवीनच अनुभव येतो. एकदुसऱ्याबद्दल जाणून घेण्याची आणि आपल्या मर्जीप्रमाणे आपल्या साथीदाराने राहावे अशी त्यांची अपेक्षा असते. पहिल्या दिवसापासूनच याची सुरुवात होते. याबाबतीत पतीपत्नी दोघांनी एक दुसऱ्यास साहाय्य करावे आणि ही प्रक्रिया बाधित होऊ नये अशाप्रकारची वर्तणूक टाळावी. प्रतीक्षेचे धोरण या स्वाभाविक प्रक्रियेस साहाय्यभूत ठरते. यशासाठी हे तत्त्व महत्वाचे आहे. प्रतीक्षा केल्यानंतरच ज्याची प्रतीक्षा केली जाते ते प्राप्त होते. हा निसर्गाचा नियम आहे आणि जगामधील कोणताही कायदा नैसर्गिक नियमावलीपेक्षा अधिक श्रेष्ठ नाही.

## ४०) दुराग्रह का निर्धार

माझ्या एका परदेशी प्रवासाच्या वेळी माझी एका ख्रिश्चन महिलेशी भेट झाली. तिचा पती दुराग्रही असल्याचे आणि त्याच्याबरोबर जुळवून घेणे अवघड असल्याचे तिने मला सांगितले. दोघे पतीपत्नी घटस्फोटाच्या निर्णयाप्रत येऊन पोहोचले होते. मी तिला सांगितले. ''ही खरी समस्या नाही, खरी समस्या विचारात आहे. जर वेगळ्या प्रकारे विचार केला तर समस्या नाहीशी होईल. पतीला दुराग्रही व्यक्ती याऐवजी निर्धार असलेली व्यक्ती समजावे. कारण दुराग्रही हा नकारात्मक शब्दप्रयोग आहे. सकारात्मक शब्दप्रयोगामुळे मनात सकारात्मक विचार येतात.''

मी त्या महिलेला पुढे सांगितले, तुझ्या पतीकडे निर्धार आहे. हा चांगला आणि मर्दानी गुण आहे.'' ज्या व्यक्तीकडे हा गुण नसेल तो आयुष्यात

आव्हानांना तोंड देऊ शकणार नाही. जी व्यक्ती आव्हानांस तोंड देऊ शकत नाही ती आयुष्यात यश प्राप्त करु शकत नाही. ती महिला भाषांतरकार होती. अनेक भाषांवर तिचे प्रभुत्व होते. ती चांगली भाषांतरकार होती. तिचा पती एका कंपनीत व्यवस्थापक होता. पत्नी तिच्या व्यवसायानुरुप विनम्र होती. उलट व्यवसायातील गरजा पूर्ण करण्यासाठी आणि तेथील आव्हानांना तोंड देण्यासाठी पती कठोर होता. तक्रार करण्याऐवजी त्या महिलेने निर्मात्याचे आभार मानले पाहिजेत.

## ४१) हुशार महिला

महाराष्ट्रातील एका कुटुंबात घडलेला नमूद करण्यासारखा हा किस्सा ! त्या कुटुंबातील मुलीने आपल्या पसंतीने एका सुशिक्षित मुलाशी विवाह केला होता. त्यांना एक मुलगा झाला. परंतु त्यानंतर या तरुण जोडप्यामध्ये मतभेद निर्माण होऊ लागले. मतभेद इतके वाढत गेले की अखेर मुलगी आपल्या माहेरी परत आली. तिने आपला पती दोषी आहे असे सांगितले.

तिचे म्हणणे ऐकल्यानंतर आईने उत्तर दिले, ''विवाह पूर्ण आयुष्यासाठी असतो. पतीबरोबर तडजोड कर किंवा तुझे आयुष्य संपवून टाक.'' आईची अशी प्रतिक्रिया असेल असे मुलीला वाटत नव्हते. तिला त्याचा शॉक बसला. ती सावरली आणि परिस्थितीवर पुन्हा विचार करु लागली. दरम्यान याच लेखकाने लिहिलेले 'राजे हयात' हे पुस्तक तिने वाचले. पुस्तक वाचल्यानंतर तिच्या लक्षात आले की, तिच्या आईचे म्हणणे बरोबर होते आणि पतीबरोबर तडजोड करण्याखेरीज दुसरा कोणताही पर्याय नव्हता. एका नवीन दृष्टीकोनातून ती आपल्या आयुष्याकडे पाहू लागली आणि पतीकडे परत जाण्याचा तिने निर्णय घेतला. परत गेल्यानंतर तिने बिनशर्त आपल्या जीवनाची नव्याने सुरुवात केली.

मी स्वत: पाहिले आहे की, आता ते सुखाने राहात आहेत. एक दुसऱ्याचे ते चांगले जीवनसाथी बनले आहेत. मतभेदांचा प्रश्न रबरबँडसारखा किंवा स्प्रिंगसारखा असतो. जर आम्ही ते ताणले नाही आणि त्याच स्थितीत ठेवले तर कोणतीही गोष्ट नियंत्रणाबाहेर जाणार नाही आणि सुलभतेने हाताळता येईल.


# ४२) कोणतीही परिस्थिती कल्याणकारी

पती आणि पत्नी यांच्या नात्यासंबंधी कुरआनमध्ये म्हणले आहे, 'चांगल्या प्रकारे आणि दयेने त्यांच्याबरोबर राहा. जर त्या तुम्हाला पसंत नसतील तर तुम्ही ज्यांना निर्मात्याने चांगुलपणा बहाल केला आहे त्यांना नापसंत करता आहात .'' (४:१९)

हे तत्त्व पती आणि पत्नी दोघांसाठी आहे. आपल्या पसंतीप्रमाणे जीवनसाथी मिळाला यावर यशस्वी कौटुंबिक जीवन अवलंबून नाही. नैसर्गिक नियमाप्रमाणे हे शक्य नाही. एक दुसऱ्याबरोबर तडजोड करणे यातच यशस्वी कौटुंबिक जीवनाचे रहस्य आहे. जे वाईट आहे त्यामध्ये चांगले शोधून काढणे महत्वाचे आहे.

सर्वसाधारणपणे माणूस एकाच प्रकारच्या आव्हानास तोंड देत असतो. स्वत:जवळ जे आहे त्याहून अधिक मिळावे असे प्रत्येकाला वाटत असते. अशाप्रकारे अतृप्त असणारा 'आदर्श साथीदार' मिळावा या शोधात ते आपले जीवन व्यतीत करतात आणि आदर्शाच्या या शोधात ते दु:खी जीवन जगत असतात.


सुख किंवा आनंद ही एक मानसिकता आहे. तिला बाह्य स्वरुप नसते. हे तत्त्व सगळ्यांनी शिकावे म्हणजे त्याला वेगळ्या दृष्टीकोनातून पाहता येईल. तुम्ही स्वत:च सुखी अथवा आनंदी होऊ शकता. ते बक्षिस म्हणून तुम्हाला कोणी बहाल करणार नाही.




**Spirit of Islam**
002, HM Wimberly, 6, Barlie Street Cross, Langford Town,
Bangalore - 560025
**Mob.:** +91-8050202626
**Email :** subscription @thespiritofislam.org
**Web :** www.spiritofislam.co.in

# SPIRIT OF ISLAM

## App Now Available at




**Download the app :**
http://goo.gl/cCGpQJ


# SPIRIT OF ISLAM


*(Montly Magazine)*


---


Towards Global Peace and Spiritual Living
**SMS for a complimentary copy :** 08050202626
**Email :** thecentreforpeace@gmail.com / **Web.:** www.cpsglobal.org


# मौलाना वहीदुद्दीन खान यांच्या मराठी पुस्तकांचे भाषांतर





Born in 1925, in Azamgarh, Uttar Pradesh, is an Islamic spiritual scholar who is well-versed in both classical islamic learning and modern disciplines. The mission of his life has been the establishment of worldwide peace. He has received the Padma Bhushan, the Demiurgus Peace International Award and Sayyidina Imam-Al-Hassan Peace Award for promoting peace in Muslim societies. He has been called ‘Islam’s spiritual ambassador to the world and is recognized as one of it’s most influential Muslims. His books have been translated into sixteen languages and are part of university curricula in six countries. He is the founder of the Centre for peace and Spirituality based in New Delhi.

वरील सर्व पुस्तिका खालील पत्त्यावर मिळतील

अब्दुस समद खलिल अहेमद

१०५०, रविवार पेठ, पुणे - ४११००२.

फोन नं. : 020-24472830 मोबा. नं.: 9665059035